## महानगरपालिका अमरावती,

### महिला व बाल विकास विभाग

जा.क्र. अमनपा/मबावि/365 /2025 — दिनांक 04/02/2025

**<u>कोटेशन नोटीस</u>**

महिला व बाल विकास विभाग, महानगरपालिका, अमरावती यांचे कडून खालील काम करण्याकरीता कोटेशन मागविण्यात येत आहे. त्याकरीता संबंधीत कार्य करणाऱ्यांनी दरपत्रक मोहोर बंद लिफाफ्यामध्ये ( कोटेशन ) दि. 10 /02/2025 रोजी सकाळी 10. 30 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे. मुदतीत प्राप्त कोटेशन शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येईल.तसेच कुठलेही कारण न देता एक किंवा सर्व कोटेशन नाकारणे , स्वीकारणे यांचे अधिकार खाली सही करणार अधिकारी यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहे.

| क्र | कामाचे नाव | दर |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थी करीता व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा विवीध ठिकाणी कार्यशाळा आयोजीत करण्याबाबत | 1 दिवसीय प्रती कार्यशाळा प्रमाणे सर्व खर्चासह दर द्यावे. |

अटी व शर्ती :-

1. वरील कामाकरीता अमरावती शहरातील संस्था यांनीच दरपत्रक द्यावे.
2. दरपत्रक सादर करतेवेळी संस्था यांनी शासनमान्य नोंदणी प्रमाणपत्र , पॅनकार्ड व आधारकार्ड जोडणे बंधनकारक राहील.
3. शासकीय विभागात महिलासंबंधीत प्रशिक्षण व योजना राबविलेल्या संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.
4. प्रती कार्यशाळा ( 1 दिवसीय) दर सर्व खर्च ज्यात सुत्रसंचालन मानधन मार्गदर्शक मानधन 03,मंडप / बिछायत,साउंड,अल्पोपहार व चहा ,लेखन साहित्य,अतीथी स्वागत व किरकोळ व इतर सर्व बाबींसह व करांसह द्यावे. ज्यात लागु असलेले सर्व शासकीय करांचा समावेश असावा.
5. मनपा आदेशीत करेल त्या संस्थेत व मुदतीत व ठिकाणी काम करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहिल.
6. कोणत्याही कारणास्तव देयक अदा होण्यास विलंब झाल्यास मनपा व्याज देणार नाही.
7. अटी असलेले दरपत्रक अपात्र असतील.
8. दरपत्रक मंजुर झाल्यास नियमानुसार मुद्रांकावर करारनामा करावा लागेल.
9. मुदतीनंतर प्राप्त दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणे तसेच योजना राबविणे बाबतचे सर्वाधिकार मा. आयुक्त यांचेकडे राखीव आहेत.
10. अधिक माहितीकरीता महिला व बालविकास विभाग , मनपा अमरावती येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

महिला व बाल विकास अधिकारी
महानगरपालिका,अमरावती

उपायुक्त (सा.)
महानगरपालिका,अमरावती

प्रतिलीपी- सिस्टीम मॅनेजर मनपा, अमरावती यांना मनपा पोर्टलवर नोटीस प्रसिद्ध करण्याकरीता